“Unite Goans to help each other”

For Private Circulation only

# AAMI GOENKAR


For Goans, Of Goans, By Goans

Issue No. 24

SEPTEMBAR 2011

In this issue...



- डॉ. कुतिन्होंची इच्छापूर्ती ..... 2
- भारतातील पोर्तुगीज ........... 3
- AGM ........................ 4
- Goan Jewels .................. 5
- Teachers day ................. 6
- रांधची कुड .................... 7
- Kansulo ...................... 8


**Editorial Board :** Shri Brahmanand D. Gaitonde Shri Mohan K. Sanzgiri Dr. Smt. Asmita S. Hegde

# डॉ. कुतिन्होंची इच्छापूर्ती व्हावी

गोमंतभूमीतील राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रांगणात गेली ७६ वर्षे तळपत राहिलेला एक प्रखर तारा निखळला. डॉ. प्रा. व्हेरिस्मो कुतिन्हो हे त्या तळपत्या ताऱ्याचे नाव. डॉ. कुतिन्हो अनंताच्या प्रवासाला निघून गेले ते केवळ कुंकळ्ळी, असोळणे, वेळ्ळी, वेरोडे आणि आंबेली या ऐतिहासिक युद्धभूमीलाच नव्हे तर राष्ट्रीय एकात्मतेच्या खऱ्याखुऱ्या संकल्पनेला तरसणाऱ्या संपूर्ण गोमंतकातील देशप्रेमींना पोरके करूनच आपल्या शरीरातील धमन्यांतील रक्त, अपघाताने पूजापद्धती बदलली तरीही हिंदू पूर्वजांचेच आहे असे अभिमानाने सर्वत्र जाहिररित्या सांगत फिरणाऱ्या आणि हा संदेश पुढच्या तीन पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जिद्द सार्थ करणारे डॉ. कुतिन्हो यांनी मृत्युनंतर, आपल्या पार्थिवाचे हिंदू पद्धतीने, हिंदू संस्कारांनी आणि हिंदू स्मशानभूमीत दहन करावे, अशी इच्छा व्यक्त केलेली असल्याने त्यांच्यावर अंत्यसंस्कार मार्डीकट्टा– कुंकळ्ळी येथील स्मशानभूमीत करण्यात आले. जिवंतपणी आपल्या प्रखर राष्ट्रवादी विचारांची आणि भरघोस व्यक्तीमत्वाची छाप भेटले, त्या प्रत्येकावर सोडलेल्या डॉ. कुतिन्होंच्या विचारांची आणि प्रभावाची छबी कधीच स्मरणाआड जाऊ शकणार नाही. वसाहतवादाविरुद्ध भारतीय भूमीवर भारतीयांनी १५८३ साली गोव्याच्या कुंकळ्ळी परिसरात दिलेला सर्वप्रथम लढा गोव्याच्या, भारताच्या आणि जगाच्या इतिहासात योग्य त्या गांभीर्याने आणि गौरवाने नमूद व्हावा, त्याला सर्व मान्यता मिळावी हा ध्यास जीवनाच्या प्रत्येक श्वासात जपणाऱ्या कुंकळ्ळी (ए.व्ही.सी.) परिसरातील ज्वलंत देशभक्तांमधील डॉ. कुतिन्हो हे अग्रगण्य नेते होते.



धर्मांतराच्या नावाखाली कुंकळ्ळीतील हैदोस घालणाऱ्या ज्या पाच पोर्तुगीजभक्त जेजुईट पाद्र्यांना कुंकळ्ळी गावातील धर्मनिष्ठ व देशनिष्ठ अशा मूळ गावकऱ्यांनी कंठस्नान घातले, त्या स्वाभिमानी, शूरवीर गावकऱ्यांनाच उलट्या न्यायाने 'खुनी' संबोधून पोर्तुगीज सत्तेची पाळेमुळे खोल रुजविण्यासाठीच हीन, नृशंस कृत्ये करणाऱ्या पाद्रींना मात्र मुक्त गोव्यातही 'हुतात्मे' कसे संबोधता, असा रोखठोक सवाल डॉ. कुतिन्हो, कुंकळ्ळीचे सुपुत्र स्वातंत्र्यसैनिक जोसिको फर्नांडिस यांनी जाहीरपणे थेट पोपच्या व्हॅटिकनसिटीच्या होली सी प्रेस ऑफिसचे संचालक डॉ. वालीस यांच्यापासून ते गोव्यातील समग्र हिंदू–ख्रिश्चन बांधवांसमोर धाडसाने उपस्थित केला.

पोर्तुगिजांनी आणि पोर्तुगिजांच्या हस्तकांनी विकृत केलेला कुंकळ्ळीचा आणि पर्यायाने गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास दुरुस्त करण्याच्या डॉ. कुतिन्होंच्या ईर्ष्येने आणि जिद्दीने जन्म दिला तो बेताळभाट – कुंकळ्ळी येथे हिंदू–ख्रिश्चन बांधवांच्या राष्ट्रीय एकजुटीतून उभे राहिलेल्या कुंकळ्ळीच्या १६ महानायकांच्या स्मृती–स्मारकाला. ते केवळ एक हुतात्मा स्मारक नसून गोव्यातील हिंदूंपासून, हिंदू संस्कृतीपासून पोर्तुगीजांनी जुलूम जबरदस्तीने तोडलेल्या धर्मांतरीत ख्रिश्चन बांधवांना आणि हिंदू समाजाला, 'समान पूर्वज–समान इतिहास–समान संस्कृती – समान राष्ट्रभाव' या ठोस भक्कम आधारावर सच्चा राष्ट्रीय एकात्मभाव गोमंतकियांमध्ये निर्माण करण्याचा देदीप्यमान संदेश देणारे जिवंत आदर्श केंद्रच ठरले आहे.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक अॅड. जोकिम डायस, स्वातंत्र्यसैनिक अॅड. गिलमन फर्नांडिस, स्वातंत्र्यसैनिक जोसिको फर्नांडिस, स्वातंत्र्यसैनिक तथा पत्रकार फ्लावियान डायस, माजी आमदार दत्ताराम देसाई, माजी नगराध्यक्ष रमेश देसाई आदी देशप्रेमी ज्येष्ठ मंडळींबरोबरच नव्या दमाचे ऑस्कर मार्टिन्स, अॅड. लेव्हिन्सन मार्टिन्स, नीरज आगियार, पत्रकार विजयकुमार कोप्रे देसाई, पत्रकार सुनील फातर्फेकर आदी तरुणांच्या गोतावळ्याला स्मारक निर्मितीच्या कामात गुंतवून ठेवण्याचे कार्य आपल्या सहकाऱ्यांसमवेत डॉ. कुतिन्हो यांनी यशस्वीपणे पार पाडले. निवृत्त होईपर्यंत लोयला विद्यापीठ शिकागो– अमेरिका येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी करणारे डॉ. कुतिन्हो हे गोवा मुक्ती लढ्यातील धडाडीचे स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांनी मुंबईत विद्यार्थी चळवळीत सक्रिय राहून गोवा मुक्ती लढ्यासाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. यावेळी प्रेमविवाहाद्वारे डॉ. कुतिन्हो यांच्या या जीवनात धर्मपत्नी म्हणून आलेल्या श्रीमती बेरील यांनी या 'झंझावाता'ला शेवटपर्यंत सार्थ साथ दिली. कुंकळ्ळीचा लढा तथा स्वातंत्र्यसंग्राम जगासमोर आणण्याचे प्रयत्न करण्यात डॉ. कुतिन्हो यांना महत्त्वाचे स्थान द्यावेच लागेल. कुंकळ्ळी (ए.व्ही.सी.) च्या आणि परिसरातील देशप्रेमी नागरिकांच्या दोन रास्त इच्छा आणि मागण्या पूर्ण करून घेण्याच्या प्रयत्नातील अंतिम टप्प्यात डॉ. कुतिन्हो होते. त्यांच्या या दोन्ही इच्छा नि ध्यास अपूर्ण राहिला. त्यामुळे त्यांचा आत्मा तळमळत असेल याची खात्री त्यांच्या सहकाऱ्यांना आहे. पहिली इच्छा कुंकळ्ळीच्या प्रेरणादायक पोर्तुगीजविरोधी स्वातंत्र्यलढ्यावर आधारित चित्रपट काढावा आणि दुसरी इच्छा शालेय अभ्यासक्रमात, पाठ्यपुस्तकात, इतिहासात कुंकळ्ळीच्या स्वातंत्र्यलढ्याची माहिती समाविष्ट करावी. या दोन्ही राष्ट्रीय महत्त्वाच्या रास्त गोष्टी पूर्ण करण्याची इच्छाशक्ती आणि धाडस आतापर्यंत तरी सरकारने दाखवले नाही. तशी इच्छाशक्तीही दिसत नाही. नपेक्षा इच्छापूर्तीचे भाग्य गेल्या १० वर्षातच डॉ. कुतिन्हो यांना जिवंतपणी लाभले असते. या दोन्ही इच्छापूर्तीसाठी राजकारण्यांकडे आणि सत्तेकडे याचना करावी लागता कामा नये, असे ठाम मत डॉ. कुतिन्हो यांचे होते. गोव्यातील जनतेकडून पैसे उभे करून चित्रपट बनविण्याच्या दृष्टीने त्यांचे सहकारी तथा ज्येष्ठ पत्रकार फ्लावियान डायस व इतरांनी एक ट्रस्ट बनविण्याचे कार्यही पूर्णावस्थेस आणले होते. निर्माता महेश राणे यांच्याबरोबर कितीतरी बैठका डॉ. कुतिन्हो यांच्या घरी आणि विद्याप्रबोधिनी, पर्वरी येथे झालेल्या होत्या. तथापि, यातही कुणाचे तरी राजकीय हितसंबंध आड आल्याने हा प्रयत्न निष्फळ ठरला. त्यानंतर डॉ. कुतिन्हो आणि त्यांच्या कुंकळ्ळीतील देशभक्त हिंदू–ख्रिश्चन सहकाऱ्यांना केवळ आश्वासनेच मिळाली हे सर्वज्ञात आहे. डॉक्टरांच्या दोन्ही इच्छा राष्ट्रहिकरिता त्यांच्या मृत्यूच्या एक वर्षाच्या आत पूर्ण करण्याची सुबुद्धी आणि सौभाग्य आम्हा संबंधितांना लाभेल का? डॉक्टरांनी केलेल्या राष्ट्रीय एकात्मेच्या कार्याशी खऱ्या अर्थाने आपण कृतज्ञ राहू शकू का?

**– सुभाष भास्कर वेलिंगकर**

**Question -** How Konkani is connected to money world ? *Search your Answer elsewhere in this bulletin*

# भारतातील पोर्तुगीज सत्तेचा उदयास्त

**लेखक : जगन्नाथ पेडणेकर**

समुद्रमार्गे १७ मे १४९८ या दिवशी पोर्तुगीज खलाशी वास्को–द–गामा हा कालीकतच्या बंदरात कषट नावाच्या खेड्याच्या किनाऱ्यावर उतरला. भारतातील युरोपियन वसाहतवादाचा तो पहिला प्रतिनिधी होय! तुर्कांनी १४६३ मध्ये कॉन्स्टेंटिनोपल शहर जिंकून घेतल्यामुळे उरलेसुरले रोमन साम्राज्य पण लयास गेले. युरोप आणि भारत यांच्यामधील खुश्कीचा मार्ग बंद झालामुळे युरोपियन राष्ट्रांना व्यापारासाठी जलमार्ग शोधून काढणे भाग पडले.

सागरी मार्ग शोधून काढण्यासाठी युरोपियन राष्ट्रांमध्ये चढाओढ सुरू झाली. पोर्तुगालचा राजा दो मानुएल व स्पेनची राणी इझाबेला यांनी वास्को द गामाला सर्व सहाय्य केले. एकेकाळी पोर्तुगाल हे स्पेनच्या अधिपत्त्याखाली होते व ही दोन्ही राष्ट्रे साडेतीनशे वर्षे अरबांच्या गुलामगिरीत होती.

वास्को द गामानंतर आफोस द आल्बुकेर्क हा हिंदुस्थानात आला. त्याने इस्माईल आदीलशहाच्या सैन्याचा पराभव केला व सन १५१० मध्ये गोवा बेट जिंकून घेतले. नोव्हेंबर १५१० हाच तो काळाकुट्ट दिवस! त्याने गोमंतकात क्रौर्याची परिसिमा गाठली.

रोमन साम्राज्याच्या विलयानंतर 'व्हिसिगोथ' या रानटी टोळीने आयबेरिय बेटावर आपली सत्ता स्थापन केली. पुढे युरोपात अरब शक्तिशाली झाल्यामुळे त्यांनी या द्विपकल्पावर आपले राज्य स्थापन केले. ४०० वर्षे लिस्बन शहर अरबांच्या ताब्यात होते.

प्रिन्यैरू शागस या प्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकाराने भारतातील पोर्तुगीज सत्तेचे पुढील शब्दात मूल्यमापन केले आहे. ''हिंदुस्थानात चाचेगिरी व क्रौर्य याबद्दल आम्ही पोर्तुगीज गुन्हेगार झालो आहोत.''

१५४२ मध्ये धर्मप्रसार करण्यासाठी सां. फ्रान्सिस्कू हा पाद्री गोमंतकात आला. १५६० मध्ये धर्मसभेची म्हणजे इन्क्विझिशनची स्थापना झाली. धर्मांतराला विरोध करणाऱ्यांना जन्मठेप अथवा जिवंत जाळण्याची शिक्षा धर्मसभेने दिल्या आहेत.

पोर्तुगालमध्ये १९१० मध्ये राज्यक्रांती झाली. राजेशाही जाऊन तेथे लोकशाही आली. परंतु ही परिस्थिती फार काळ टिकली नाही. तेथे २८ मे १९२६ या दिवशी कारमोना सालाझार याची सर्वाधिकारशाही स्थापन झाली. १९३५ मध्ये या सरकारने वसाहतीची सनद ह कायदा प्रसिद्ध केला व वसाहतीतील लोकांचे पोर्तुगीज, पोतुगिजादु व देशज असे तीन प्रकार जाहीर केले. या सनदेमुळे स्वत:ला कट्टर पोर्तुगीज समजणाऱ्या काही गोवेकर लोकांचे राजनिष्ठेचे प्रदर्शन निष्फळ ठरले.

गोमंतकातील काही पाद्रींनी १७८७ मध्ये पोर्तुगीज सत्तेविरुद्ध बंड केले. याला पिंटोंचे बंड असे म्हणतात. पणजी येथील पाद्री कायतानु फ्रांसिस्कु कौंतु हे या बंडाचे नेते होते. 'गोमंतकियांचे लोकसत्ताक राज्य स्थापन करणे हा या बंडाचा उद्देश होता. सरकारने या सर्वांना पकडले व त्यांना जन्मठेप, देहांत अशा शिक्षा ठोठावण्यात आल्या.

सत्तरीच्या राण्यांनी पोर्तुगीज सत्तेविरुद्ध नेहमीच बंड केले आहे. सत्तरीचे राणे हे डोंगरकपारीतील वाघ आहेत. दीपाजी राणे यांनी १८५२ मध्ये पोर्तुगीज सत्तेविरुद्ध लढा दिला. दीपाजीने मादई नदीच्या काठावरील नानूजचा किल्ला सर केला व तेथील शस्त्रांचा साठा व दारूगोळा आपल्या ताब्यात घेतला. हा किल्ला हे या क्रांतिकारकाचे मुख्य ठाणे बनले. दीपाजीने कुंभारजुवे, सांगे, केपे, काणकोण व फोंडे हे प्रदेश मुक्त केले. पुढे पोर्तुगीजांनी दीपाजी राणे बरोबर तह केला व त्यांना मानाची जागा दिली. इतिहास दादा राणेंच्या बंडाचाही उल्लेख आहे.

मिशनऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या सहाय्याने गोमंतकात मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवून आणले होते. परंतु धर्मांतरीतांमध्ये आपल्या धर्माबद्दल व संस्कृतीबद्दल प्रेम व आत्मियता बसत होती. गोमंतकातील हिंदू पुढाऱ्यांनी या धर्मांतरीत हिंदूंचे पुन: आपल्या धर्मात घेण्यासाठी शुद्धी मोहीम सुरू केली.

सातारा येथील मसुराश्रमाचे प्रमुख श्री. विनायकराव महाराज मसूरकर यांना या शुद्धीसंस्कारासाठी गोमंतकात येण्याचे निमंत्रण धाडण्यात आले. ते आपल्या शिष्य परिवारासह आले व त्यांनी पणजी जवळील चिंबल येथे सुमारे ७८१५ धर्मांतरितांना हिंदू धर्मात परत आणले. हे सर्व धर्मांतरीत सरकारी धाकामुळे व दडपशाहीमुळे ख्रिश्चन बनले असले तरी ते खासगीरित्या गुप्तपणे हिंदू धर्माचे पालन करीत होते. ही शुद्धीकरणाची चळवळ ही गावड्यांचे शुद्धीकरण या नावाने प्रसिद्ध आहे.

सरकारने मसुराश्रमाचे स्वामी विनायकराव यांना प्रथम अटक केली व नंतर भारताच्या दबावाखाली त्यावेळचे गव्हर्नर जनरल मासान दे आमोरी यांनी त्यांची सुटका केली आणि गोमंतकात धार्मिक स्वातंत्र्य असल्याचा निर्वाळा दिला.

पणजी या गोमंतकाच्या राजधानीत गोमंतकातील एक ज्येष्ठ नेते गोविंद पु. हेगडे देसाई यांनी १९१२ मध्ये 'भारत' हे मराठी–पोर्तुगीज भाषेतील साप्ताहिक काढले. हिंदू समाजाचे जागरण व राष्ट्रवादाचा प्रचार हे या पत्राचे ध्येय होते. सरकारने या पत्रावर अनेक खटले भरले. व्हास्कू द गामा याच्या भारतातील आगमनाबद्दल गामा दिन पाळण्याचे सरकारने ठरविले. त्यावेळी भारतकार हेगडे यांनी या गोष्टीला विरोध केला व 'हे गामाचे श्राद्ध हिंदूंनी का करावे?' असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला. त्यांचा हा प्रश्न लोकमान्य टिळकांनी विचारलेल्या 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' प्रश्नाची आठवण करून देतो.

पोर्तुगीज सत्तेविरुद्धच्या लढ्यात गोमंतकातील मराठी नियतकालिकांनी आपला सिंहाचा वाटा उचलला. गोमंतकात राष्ट्रीय भावना जागृत करण्याचे काम या वृत्तपत्रांनी केले. सूर्याजी महात्मे यांच्या संपादकत्वाखाली १८७० मध्ये 'आनंद लहरी', तर १८७२ मध्ये 'देश सुधारणेच्छु' नावाचे मासिक प्रसिद्ध झाले. सुब्राय नायक यांच्या संपादकत्वाखाली १८८२ मध्ये 'गोवा मित्र' हे मासिक तर १८८५ मध्ये 'आर्य बंधू', 'गोवात्मा' व 'गोवा पंच' ही तीन नियतकालिके निघाली. १८८७ मध्ये 'श्रीखंड' व 'सुदर्शन' व १९१० मध्ये पणजीमधून 'हिंदू मत' नावाचे द्विभाषीक साप्ताहिक प्रसिद्ध झाले. प्रभात, भारत या पत्रांनी आपले काम केले.

१८ जून १९४६ या दिवशी डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोमंतकात मडगाव येथील मैदानात सभा घेऊन गोमंतकियांना आवाहन केले. हा दिवस गोमंतकात क्रांतिदिन म्हणून पाळला जातो.

त्रिशतांळ ब्रागांस कुन्य यांचा जन्म सासष्टीतील चांदर या गावी १८९१ या वर्षी झाला. पाँडिचेरी येथून फ्रेंच भाषेतून ते पदवीधर झाले. त्यांनी फ्रेंच वृत्तपत्रातून अनेक लेख लिहिले. त्यांचे 'दी नॅशनलायझेशन ऑफ गोवन्स' हे पुस्तक फार प्रसिद्ध आहे. दिनांक २४ जुलै या दिवशी कुन्य यांचा खटला लष्करी न्यायालयात उभा राहिला. त्यांना आठ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा व राजकीय अधिकार स्थगित अशी शिक्षा देण्यात येऊन त्यांना पोर्तुगालमधील पेशीन या किल्ल्यातील तुरुंगात ठेवण्यात आले.

लक्ष्मीकांत प्रभू भेंब्रे यांनी १९४६ मध्ये सत्याग्रह केला. त्यांना ४ वर्षांचा

कारावास मिळाला. सुटकेनंतर त्यांना ११ वर्षे पोर्तुगालमध्येच रहावे लागले.

पुरुषोत्तम काकोडकर यांना ९ वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावली गेली तर ५ डिसेंबर १९४६ या दिवशी डॉ. रामकृष्ण हेगडे यांना ८ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली. पां. पु. शिरोडकर यांना चार महिने तुरुंगवास झाला. दिनांक २६ जानेवारी १९४७ या दिवशी त्यांची कारागृहातून सुटका झाली. सुप्रसिद्ध मराठी गोमंतकीय साहित्यिक श्री. लक्ष्मणराव सरदेसाई यांना पकडण्यात आले. जवळजवळ एक वर्ष ते आग्वाद किल्ल्यात बंदिस्त होते. ५ मे १९४८ या दिवशी पुराव्याअभावी त्यांना सोडून देण्यात आले.

पोर्तुगिजांच्या तावडीतून दादरा जुलै १९५४ ला 'युनायटेड फ्रंड ऑफ गोवन्स'ने मुक्त केला तर २८ जुलै १९५४ या दिवशी नरोली व नगरहवेली मुक्त करण्यासाठी सर्वश्री प्रभाकर सिनारी, सुप्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके, शामराव लाड, मनोहर पेडणेकर, विष्णू पेडणेकर, टोंनी फर्नांडीस, त्रिंबक भट निघाले. त्यांच्याबरोबर १२ बोअर बंदुका व ६ पिस्तुले होती. सुधीर फडके यांनी व्हायोलिनच्या पेटीतून लपवून एक लहानशी जपानी बंदूक नेली होती. सुधीर फडके, वाकणकर यांच्या बरोबर आलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. त्यांनी २ रायफल्स आणल्या होत्या. विश्वनाथ लवंदे ५० कार्यकर्ते घेऊन त्यांना मिळाले. १० ऑगस्ट १९५४ या दिवशी नगरहवेली, सिलव्हासा मुक्त झाले.

पंधराव्या शतकापासून गोमंतकीय क्रांतिकारकांनी पोर्तुगीज सत्तेविरुद्ध दिलेला लढा, सौ. सुधाताई जोशी, सिंधू देशपांडे, श्रीमती शारदा सावईकर, शालिनी लोलयेकर, कुमुदिनी पैंगिणकर, विलासिनी प्रभू आदी महिलांचा सत्याग्रह देशभक्तांनी पत्करलेले हौतात्म्य व भारत सरकारने केलेली दिनांक १९ डिसेंबर १९६१ या दिवशीची पोलीस कारवाई यामुळे भारतातील पोर्तुगीज सत्तेचा अस्त झाला व गोमंतकाला स्वातंत्र्य मिळाले. गोमंतक भारतीय संघराज्याचा अविभाज्य घटक बनला. पोर्तुगीज गव्हर्नर जनरल, व्हासालु द सिल्व्हा यांनी दिनांक १९ डिसेंबर १९६१ या दिवशी ब्रिगेडियर के. एस. धील्लन यांना शरणागतीचा दस्तऐवज सुपूर्त केला. या विजय मोहिमेचे सूत्रधार ले. जनरल कँडेथ यांनी गोमंतकाच्या भूमीवर ध्वजारोहण केले आणि संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्याचे स्वप्न साकार झाले.

***संदर्भग्रंथ 'गोवा दमण दिव स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास'***

(मागील अंकात 'सत्याग्रहाची मोहीम' या लेखात सौ. सुधाताई जोशी या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पत्नी असा चुकीचा उल्लेख झाला होता त्याबद्दल क्षमस्व. सुधाताई या श्री. महादेवशास्त्री जोशी यांच्या पत्नी होत्या.)

■

## कोंकणी म्हणी व वाक्प्रचार

कोकणी भाषा कर्णमधुर व समृद्ध भाषा म्हणून ओळखली जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या म्हणी व वाक्प्रचार यांमुळे भाषेचे सौंदर्य अजून खुलते. अशा म्हणी व वाक्प्रचारांचा संपन्न खजिना कोंकणी भाषेत आहे. काळाच्या ओघात हा खजिना लुप्त होऊ नये म्हणून कोंकणी परिषदेच्या निमित्ताने अशा सर्व म्हणी व वाक्प्रचारांचा संग्रह प्रसिद्ध करण्याचे 'आमी गोंयकार'ने ठरविले आहे. वाचकांना आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी स्वत:स माहित असलेल्या वा कधीतरी कानावर पडलेल्या सर्व म्हणी व वाक्प्रचार अर्थासहित आम्हाला ऑफिसच्या पत्त्यावर वा ई मेलद्वारे पाठवावे. जाणत्यांची मदत अवश्य घ्यावी.

***A true Goan?***
***Proud of your mothertongue? Hurry up !!!***

Come and attend

# 'Konkani Parishad'

on Feb 17- 19, 2012

**Venue :** Swatantryaveer Savarkar sabhagrih,
Shivaji Park, Dadar(W).

The event will be full of Debates, Seminars, Cultural activities, Entertainment programmes, food festival and lots more....

**Open for all those who love Konkani**
**For enquiries call**
**9821151068 / 9820062484 / 9821167456**






**The 7th Annual General Body Meeting of 'Aami Goenkar' was held on Sept. 24th, 2011 at Bandra Hindu Association at 6 P.M. Apart from the routine matters following programmes and future activities were discussed: i) To stage Konkani dramas in Mumbai to showcase the writing skills and artistic talent of Goans. ii) Provision of accomodation in Mumbai to relatives of patients and young students coming from Goa.**

# GOAN JEWELS



"The Hon'ble Bombay High Court has recently honoured Advocate Shri Keshav M. Naik by designating him as a Senior Counsel. This is a rare distinction and a coveted position conferred on an Advocate for his outstanding Court performance in the legal profession and his special contribution to the development of law. This is a great honour to all Goans."



'मिटकॉन' तर्फे आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र उद्योगिनी' या स्पर्धेत पहिल्या तीस महिला स्पर्धकात येण्याचा मान मडगाव येथील प्रसिद्ध केटरर सौ. सुनिता गावणेकार यांना मिळाला. गोवा व महाराष्ट्रातील ३००० महिला उद्योजकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. त्यातील १४० महिलांची प्राथमिक फेरीत निवड झाली. सौ. गावणेकारांनी 'बांबूच्या कोवळ्या अंकुराचे लोणचे' हा वेगळा पदार्थ बनवला होता. पुण्यात झालेल्या दुसऱ्या मुलाखतीच्या फेरीत ३० महिलांना निवडण्यात आले. हा मान मिळविणाऱ्या सौ. गावणेकार ह्या पहिल्या गोमंतकीय महिला आहेत.




**Rema Kurade** Secured 92.3% marks in H.S.C. (Goa Board). Student of Shree Damodar Higher Secondary School. Ranked 13th in Goa CET with 198/225 marks.




*मडगाव येथील मल्टिपर्पज हायस्कूलमधील माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. पुष्पा गायतोंडे यांना यंदाचा राष्ट्रीय पातळीवरील 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार मिळाला. त्यांना राज्य पातळीवरील 'आदर्श शिक्षक' हा पुरस्कार २००७ साली मिळाला होता. गेली ३५ वर्षे शिक्षिका म्हणून त्या कार्यरत असून विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांमध्ये त्यांचा सहभाग आहे.*

*लग्नाच्या गाठी जरी स्वर्गात बांधल्या जात असल्या तरी त्या धाग्यांना पृथ्वीतलावर एकत्र आणण्यास कोणीतरी निमित्तमात्र व्हावे लागते. सलील आचार्य आणि स्मिता लवंदे यांच्यात असे रेशमाचे बंध जुळविण्यात 'आमी गोंयकार'च्या श्री. विश्वनाथ संझगिरी यांच्या पुढाकाराने चाललेल्या वधुवर सूचक मंडळाला यश आले.*

*नवदाम्पत्याला 'आमी गोंयकार'तर्फे शुभेच्छा!*



***'Aami Goenkar' is happy to bring to you award winning Konkani drama from the land of Goa-***

# 'Suring'

**On Sunday Nov. 20th, 2011 at 8 p. m.**

Venue: Swatantryaveer Sawarkar sabhagriha,
Next to Mayor's Bunglow, Shivaji Park, Dadar (W).

**Writer: Mr. Pundalik Naik**

**Director: Sridhar Kamat Bambolkar**

The play presents helpless elements of society living with explosive hearts. The play even though written 25 years back, has a theme which is more relevant today.

**To book your tickets early, please contact**
**9821151068 / 9820062484 / 9821167456.**

*Visit*

***'Aami Goenkar'***

## 'Vadhu-Var Suchak Mandal'

Dadar Office, under the management of

**Mr. Vishwanath Sanzgiri**

on every Wednesday
between 4.30 p.m. and 6.00 p.m.

For details, please call our office at 65528694
or at the resi. of

**Mr. V. K. Sanzgiri**

Tel. : 2412 5822 or Mobile : 9819718233
(Bet. 9.00 a.m. & 12.00 noon,
and bet. 4.00 p.m. and 7.00 p.m.)

**Question-** Trace Goa on Indian Negotiable Instruments? *Search your Answer elsewhere in this bulletin*

# *Celebrating `Teachers day'*

Principal Subhash Bhaskar Velingkar was felicitated on Sept. 5th, 2011 (Teacher's Day) by office bearers of 'Aami Goenkar'..

He has 39 yrs of teaching Experience - **12 years** at Shantadurga High School, Bicholim as Teacher, **7 years** as Headmaster at New English High School (presently Ramakant Khalap High School), Mandrem, **3 years** as Principal of Shiroda Higher Secondary School, Shiroda – Goa and **17 years** as Principal of Vidya Prabodhini Higher Secondary School, Parvari – Goa.



He is pioneer of "Super School Complex" – an extension of school complex scheme at Higher Secondary Level in Goa. He is Chief Coordinator and elected State Vice-President of School Complex Scheme covering 1606 schools right from Primary to Higher Secondary Schools in Goa, for 10 years. He is member of State Educational Advisory Board of Goa Government for 4 years. He is secretary of Prabodhan Education Society (Vidya Prabodhini), Parvari. He is also working as advisor for "Vidya Bharati," a State Level Educational Organisation having a network of 70 Educational institutes at Pre-Primary and Primary Level. He is an excellent resource person for workshops for Motivation of Youth, General Public, PTA's, School Complex Scheme, Teachers etc.

Velingkar Sir was recipient of 'Best Teacher' Award by State Government for the year 1990-91. He was felicitated with 'Best Teacher' Award at National Level in 2003 at the hands of President Dr. A.P.J.Abdul Kalam. He was honoured with certificates by Directorate of Education for scoring 100% results consequently for 6 years for S.S.C. for the school, as well as in his own subjects English and Social Sciences.

Velingkar Sir is a multifaceted personality. Apart from teaching he also worked as Journalist – as Sub-Editor at daily Navaprabha for a year and as correspondent for Marathi daily Navaprabha, English daily West Coast Times and All India Radio, Goa. He was felicitated with "Freedom Fighter Late Atmaram Mayenkar" Award by Goa, Daman and Diu Freedom Fighters' Association and Navajivan Society of Freedom Fighters.

He worked as state Vice-President of NOTE, India (National Organisation for Tobacco Education). He is also Managing Committee member of Goa Cancer Society, Jan Shikshan Saunsthan, Goa and Popular High School, Madgao. He is a member of High Power Committee of Goa Government for implementation of Anti – Tobacco Act.

He is also a social activist. He organised and led State-wide agitation against anti-national celebration of 5th century of Arrival of Vasco de Gama in India. For protesting against haphazard implementation of NCERT syllabus and textbooks, he started "Shiksha Bachao Andolan". Similarly for survival of Govt. Marathi Schools in Goa, he led "Marathi Bachao Andolan". Recently he played prominent role in 'Bharatiya Bhasha Suraksha Manch' agitation against Englishization of primary Education in Goa.

## EMPLOYMENT NEWS

There are certain vacancies for the post of Manager/ Accountant (part time/full time) in Housing Societies in Mumbai. Interested Goans may send their sealed applications (retired may also apply) to "Aami Goenkar" office. The remuneration shall be commensurate with experience and qualifications.

## APPEAL FOR HONORARY SERVICE

'Aami Goenkar' is seeking honorary services from culturally inclined individuals for our Dadar Office - Pl. contact Shri. Vivek Prabhudesai - 9920516016

## माझे गोव्यांत माहेर

माझे वडील कुबेर
दिला रत्नांचा अहेर
माझें गोव्यांत माहेर
माझें गोव्यांत माहेर

माझ्या माहेराची वाट
जाईजुईचा ग थाट
असा दर्वळ दर्वळ
बाई मावेना मनात

असे नारळ मधाळ
कुळागरें काळींशार
माझ्या माहेराचें पाणी
त्याला अमृताची सर

लावतांना सांजवात
आई मला आठवते
नदी भेटते सागरा
उगमाचा ध्यास घेते

माझे भाऊ भावजय
कृष्ण–रुक्मिणीचा जोडा
आला वसंत माघारा

**– रामदास प्रभू**

# रांधची कुड

## Paneer-Mushroom Kadai


**Ingredients**-1 pkt mushrooms (cut into long slits), 3 tomatoes medium sized(sliced), 5 onions medium sized(sliced), 1/2 cup paneer cubes,1/2 cup boiled fresh Green peas,3 tablespoon oil, 1 tablespoon ginger-garlic paste,1/4 cup Chopped cashewnuts,1/4 cup curd, 1 teaspoon kasoorimethi(soaked in Water),2 maggie cubes(powdered),1 tablespoon red chilli powder, 1/4 teaspoon haldi powder,1/2 teaspoon garam masala, 1 tablespoon Chopped coriander leaves, salt and sugar to taste.

**Method** - Heat oil in a kadai and sauté sliced onions to a light pink colour. Add Sliced tomatoes and sauté them.Grind half of the above from kadai with Chopped cashewnuts. To the remaining half in the kadai add ginger-Garlic paste fry it nicely and add mushroom (do not add water).Cover And cook on a low flame,now add boiled green peas and paneer. Saute Them. To this add ground paste of tomato and onion. Cook further. When Almost done add maggie cubes, red chilli powder, haldi, garam masala powder, soaked kasoori methi, salt and sugar. Lastly add curd. Simmer for 10 minutes till the gravy is thick. Mix well, sprinkle chopped coriander Leaves at the time of serving. Serve hot with roti or rice..

**- Mrs. Sharmila Shetye,** Mapusa- Goa




*नोटेवरची ६ नंबरची लाईन ही कोंकणी भाषेत आहे*



**HAPPY CHILDREN'S DAY**
**(14-11-2011)**

*On the occasion of the birth anniversary of Pt. Jawaharlal Nehru, 'AAMI GOENKAR' salutes his vision & resolves to serve mother India with renewed vigour & passion.*

## THANKS GIVING

Mr Rajendra Bhagat ( Goa ) conveyed thanks to **AAMI GOENKAR**, Goan friends & other Charitable Trusts in Mumbai for their generous donations & support towards his ailing daughter Miss Rashmi Bhagat (Aged 14 years) studying in $10^{th}$ std at curchorem Goa, presently undergoing Medical Treatment at P.D. Hinduja.N. Hospital Mumbai( since unavailable in goa)

Doctors said that Miss Rashmi Bhagat is out of danger and is recovering fast

-----------------------xxx-----------------------

Rightly said, Make it a rule if possible, never to lie down at night without being able to say, "I have made one human being at least wiser, a little happier or a little better this day".

## Aspirations of Goan Children

# MERRY CHRISTMAS & HAPPY NEW YEAR

*Goans eagerly wait for नाताल to arrive with*
***Fun, Frolic & Music.***

*Our loving children pray that God's messenger (Santa Claus) bring them the Gift of*

***Happiness, Good Health & Prosperity!***
***'Amen!'***

# *Scenes from 'Kansulo' a Konkani drama staged on Nov. 5th in Mumbai*




For any correspondence, Please contact
**Aami Goenkar**
12/43, Khandke Building, Ground Floor,
J. K. Sawant Road, Opp. Shivaji Mandir,
Dadar (West), Mumbai - 400 016.
E-mail: aami_goenkar@yahoo.com
Website : www.aamigoenkar.org
**Phone :** 65528694 (Office Time 5 p.m. to 7 p.m.)

To,

Printed by Siddhi Offest Pvt. Ltd., 12, Kamat Industrial Estate, Prabhadevi, Mumbai - 400 025 & Published by Aami Goenkar', 12/43, Khandke Building, Ground Floor, J. K. Sawant Road, Opp. Shivaji Mandir, Dadar (West), Mumbai - 400 016. Phone : 65528694. We do not take any responsibility for the contents & opinion expressed in the articles herein.